# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:13.05.2025** **वार:मंगळवार**

1. पाकिस्तानशी चर्चा झाली, तर ती फक्त दहशतवादावरच होईल; पंतप्रधानांची स्पष्टोक्ती
2. अण्वस्त्र धमकीला भारत अजिबात भीक घालणार नाही-पंतप्रधानांचा परखड इशारा
3. 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये सैन्य दलांनी दाखवलेलं शौर्य देशातील माता भगिनींना समर्पित करत असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन
4. सहकार कायद्यात आवश्यक बदल करण्यासाठी समिती स्थापन करणार-मुख्यमंत्र्यांची माहिती
5. राज्य शिक्षण मंडळाच्या इयत्ता दहावीच्या परीक्षेचा निकाल आज होणार जाहीर आणि
6. भारताचा आघाडीचा फलंदाज विराट कोहली याची कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती

**पंतप्रधान**

'पाकिस्तानशी चर्चा झाली तर ती फक्त दहशतवादावरच होईल, पाकिस्तानशी चर्चा झाली तर ती फक्त पाकव्याप्त काश्मीरवरच होईल आणि हेच आमचं स्पष्ट धोरण आहे', असा परखड इशारा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल संपूर्ण जगाला दिला. 'पाकिस्तानला टिकून राहायचं असेल तर त्यांना दहशतवादाची पाळंमुळं नष्ट करावीच लागतील; दहशतवाद आणि चर्चा एकत्र होणार नाही, दहशतवाद आणि व्यापार एकत्र सुरू राहणार नाही. पाणी आणि रक्त देखील एकत्र वाहू शकत नाही', असा सज्जड इशारा पंतप्रधान मोदी यांनी दिला. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारतानं पाकिस्तानला सडेतोड प्रत्युत्तर दिलं; त्यानंतर प्रथमच पंतप्रधानांनी काल राष्ट्राला संबोधित केलं. एकीकडे प्रत्येक भारतीय नागरिकाला सुरक्षिततेबाबत आश्वस्त करतानाच त्यांनी पाकिस्तानला कठोर इशारा दिला आणि संपूर्ण जगाला भारताची ठाम भूमिका ठणकावून सांगितली.

'दहशतवादाच्या विरोधात भारताची कठोर कारवाई यापुढेही सुरूच राहील; अण्वस्त्र धमकीला भारत अजिबात भीक घालणार नाही'; असा परखड इशाराही पंतप्रधानांनी दिला. भारतानं 'ऑपरेशन सिंदूर' स्थगित केलं आहे; ते थांबवलेलं नाही, पाकिस्तानच्या प्रत्येक हालचालींवर भारताची नजर आहे; दहशतवादाला खतपाणी घालणारं सरकार आणि दहशतवादी संघटना आम्ही वेगवेगळ्या मानत नाही, असं ते म्हणाले.....

**ऑपरेशन सिंदूर ने आतंक के खिलाफ लड़ाई में एक नई लकीर खींच दी है, एक नया पैमाना, न्यू नॉर्मल तय कर दिया है। पहला- भारत पर आतंकी हमला हुआ तो मुंहतोड़ जवाब दिया जाएगा। हम अपने तरीके से, अपनी शर्तों पर जवाब देकर रहेंगे। हर उस जगह जाकर कठोर कार्यवाही करेंगे, जहां से आतंक की जड़ें निकलती हैं। दूसरा- कोई भी न्यूक्लियर ब्लैकमेल भारत नहीं सहेगा। न्यूक्लियर ब्लैकमेल की आड़ में पनप रहे आतंकी ठिकानों पर भारत सटीक और निर्णायक प्रहार करेगा। तीसरा- हम आतंक की सरपरस्त सरकार और आतंक के आकाओं को अलग-अलग नहीं देखेंगे। ऑपरेशन सिंदूर के दौरान,**

**दुनिया ने, पाकिस्तान का वो घिनौना सच फिर देखा है, जब मारे गए आतंकियों को विदाई देने, पाकिस्तानी सेना के बड़े-बड़े अफसर उमड़ पड़े। स्टेट स्पॉन्सरड टेरेरिज्म का ये बहुत बड़ा सबूत है। हम भारत और अपने नागरिकों को किसी भी खतरे से बचाने के लिए लगातार निर्णायक कदम उठाते रहेंगे।**

'ऑपरेशन सिंदूर'द्वारे भारतीय सैन्यानं शंभरहून अधिक दहशतवाद्यांना कंठस्नान घातलं; पाकिस्तानला भारताच्या सीमांवर हल्ले करायचे होते, पण भारतानं पाकिस्तानच्या वायूसेनेच्या तळांवर नेमके आणि अचूक हल्ले करत ते नेस्तनाबूत केल्याचं मोदी यांनी सांगितलं.

'ऑपरेशन सिंदूर' हे केवळ नाव नाही; तर न्यायाची अढळ प्रतिज्ञा आहे; कोटी कोटी भारतीयांच्या भावनांचं प्रतिबिंब आहे; असं प्रतिपादन पंतप्रधानांनी केलं. आमच्या माता भगिनींच्या कपाळावरचं कुंकू पुसण्याचा काय परिणाम होतो, हे आता प्रत्येक दहशतवाद्याला आणि दहशतवादी संघटनेला कळून चुकलं असेल, असं पंतप्रधान म्हणाले. पहलगाम हल्ल्यानंतर संपूर्ण देश, प्रत्येक नागरिक, सर्व राजकीय पक्ष दहशतवादविरोधी कारवाईसाठी एकत्र उभे ठाकले; आणि जेव्हा 'राष्ट्र प्रथम', या भावनेनं देश एकजूट होतो, तेव्हा कठोर निर्णयही घेतले जातात आणि त्यांचे परिणामही दिसतात, असं त्यांनी सांगितलं. 'ऑपरेशन सिंदूर' राबवण्यासाठी योगदान देणाऱ्या प्रत्येक घटकाला पंतप्रधानांनी वंदन केलं; आपल्या शूर सैनिकांचं हे शौर्य त्यांनी देशातील माता भगिनींना समर्पित केलं....

**मैं सबसे पहले भारत की पराक्रमी सेनाओं को, सशस्त्र बलों को, हमारी खुफिया एजेंसियों को, हमारे वैज्ञानिकों को, हर भारतवासी की तरफ से सैल्यूट करता हूं। हमारे वीर सैनिकों ने 'ऑपरेशन सिंदूर' के लक्ष्यों की प्राप्ति के लिए असीम शौर्य का प्रदर्शन किया। मैं उनकी वीरता को, उनके साहस को, उनके पराक्रम को, आज समर्पित करता हूं- हमारे देश की हर माता को, देश की हर बहन को, और देश की हर बेटी को, ये पराक्रम समर्पित करता हूं।**

"भगवान बुद्धांनी आपल्याला शांतीचा मार्ग दाखवला आहे; मात्र शांती आणि समृद्धीकडे वाटचाल करण्यासाठी, विकसित भारताचं स्वप्न पूर्ण करण्यासाठी भारत शक्तिशाली असणं देखील आवश्यक आहे आणि जेव्हा गरज पडेल तेव्हा या शक्तीचा वापर करणंही आवश्यक आहे", असं पंतप्रधानांनी नमूद केलं.

**डीजीएमओ चर्चा**

दरम्यान, भारत आणि पाकिस्तान यांच्यात गेल्या शनिवारी झालेल्या शस्त्रसंधीनंतर काल डीजीएमओ स्तरावरील चर्चा झाली. या चर्चेत दोन्ही बाजूंच्या सैन्याकडून बंदूकीची एकही गोळी झाडली जाता कामा नये, तसंच एकमेकांविरुद्ध कोणतीही आक्रमक कारवाई केली जाऊ नये, यावर सहमती झाल्याचं भारतीय लष्करानं आपल्या निवेदनात म्हटलं आहे. सीमेवरील सैन्य कमी करण्यासाठी तत्काळ उपाययोजना करण्यालाही दोन्ही देशांच्या लष्करानं संमती दर्शवली आहे.

**मुख्यमंत्री-संरक्षण दल**

भारत आणि पाकिस्तान तणावाच्या पार्श्वभूमीवर काल राज्य सरकारनं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली संरक्षण दलांसोबत एक महत्त्वपूर्ण बैठक घेतली. राज्यातली सुरक्षा आणि सज्जता यासंदर्भात गुप्तचर माहितीचं आदानप्रदान, तंत्रज्ञानाचा अधिक वापर आणि काय खबरदारी घ्यायची तसंच

संरक्षण दलांना राज्य सरकारतर्फे अपेक्षित असलेलं सहकार्य आणि अधिक गतीमान समन्वय यंत्रणा उभारण्यावर या बैठकीत चर्चा झाली. भारतीय सैन्यानं ज्या ताकदीनं आणि अचूकपणे ऑपरेशन सिंदूर राबवलं, ते अभूतपूर्व असल्याचं मुख्यमंत्री म्हणाले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार तसंच सैन्य दलातील वरिष्ठ अधिकारी या  बैठकीला उपस्थित होते.

**<u>मुख्यमंत्री-सहकार</u>**

राज्यातल्या सहकार कायद्यात कालानुरूप बदल करण्यासाठी राज्य सरकार एक समिती स्थापन करणार आहे. या समितीच्या माध्यमातून अभ्यास करून सहकार कायद्यात आवश्यक बदल करण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल केली. विद्यमान सहकारी संस्थांच्या बळकटीकरणाचा अभ्यास करण्यासाठीही समिती नेमणार असल्याचं मुख्यमंत्री म्हणाले. 'सहकाराचं सक्षमीकरण आणि शासनाचं धोरण' या विषयावर मुंबईत आयोजित परिसंवादात ते बोलत होते. माजी केंद्रीय मंत्री शरद पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार या परिसंवादाला उपस्थित होते.

**<u>दहावी निकाल</u>**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे यावर्षी फेब्रुवारी आणि मार्च महिन्यात घेण्यात आलेल्या इयत्ता दहावीच्या परीक्षेचा निकाल आज जाहीर होणार आहे. दुपारी एक वाजल्यापासून विद्यार्थ्यांना मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर हा निकाल पाहता येणार असल्याचं मंडळाचे सचिव देविदास कुलाळ यांनी पत्रकाद्वारे कळवलं आहे.

**<u>बुद्ध पौर्णिमा</u>**

देशासह राज्यात काल बुद्धपौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली. पुणे, नाशिक, लातूरसह राज्यात ठिकठिकणी धम्मवंदना, धम्मगीतं, प्रवचन, शांतता फेरी आयोजित करण्यात आली होती.

**<u>खेलो इंडिया</u>**

बिहारमध्ये सुरू असलेल्या सातव्या खेलो इंडिया क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्रानं कालही पदकांची कमाई करत पदक तालिकेतील अव्वल स्थान कायम राखलं. महाराष्ट्राने 38 सुवर्ण, 26 रौप्य आणि 25 कांस्य अशी 89 पदकांची कमाई केली आहे. ॲथलेटिक्समधील मुलींच्या 100 मीटर अडथळा शर्यतीत शौर्या अंभुरे आणि मुलांच्या गटात सैफ चाफेकर यांनी सुवर्ण पदकावर आपलं नाव कोरलं. भारोत्तोलनात साईराज परदेशी यानं नव्या विक्रमासह सुवर्णपदक मिळवलं तर मुलींच्या गटात तनुजा पोळ हिनंही सोनेरी यशाला गवसणी घातली. तलवारबाजीत साईप्रसाद जंगवाडनं सुवर्ण कामगिरी केली. जिम्नॅस्टिक प्रकारात परिना मदनपोत्रा हिनं सुवर्ण पदकावर आपलं नाव कोरलं.

**<u>विराट कोहली</u>**

भारतीय क्रिकेट संघाचा माजी कर्णधार आणि आघाडीचा फलंदाज विराट कोहली यानं काल कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली. विराटनं समाज माध्यमावरील संदेशाद्वारे चाहत्यांना निवृत्तीचं वृत्त देऊन आपल्या कसोटी कारकिर्दीला उजाळा दिला. विराट कोहलीनं आपल्या 4 वर्षांच्या कसोटी कारकिर्दीत 123 सामन्यांमध्ये 9 हजार 230 धावा केल्या आहेत. भारतीय संघाकडून सर्वाधिक धावा करणारा तो चौथ्या क्रमांकाचा फलंदाज आहे. 2011 मध्ये कसोटी क्रिकेटमध्ये पदार्पण केलेल्या कोहलीनं 68 सामन्यांमध्ये

भारतीय संघाचं नेतृत्व केलं. कर्णधार म्हणून तो सर्वाधिक सामने खेळणारा तसंच सर्वाधिक सामने जिंकलेला भारतीय कर्णधार आहे.

**<u>आयपीएल</u>**

भारत आणि पाकिस्तान मधील वाढत्या तणावामुळे मध्यंतरी स्थगित करण्यात आलेले भारतीय प्रीमियर लीग 2025 अर्थात आय पी एल क्रिकेट सामने एका आठवड्याच्या विश्रांतीनंतर, या महिन्याच्या 17 तारखेपासून पुन्हा सुरू होणार असल्याची घोषणा भारतीय क्रिकेट नियामक मंडळ अर्थात BCCI नं केली आहे. भारत सरकारनं गेल्या नऊ मे रोजी 'ऑपरेशन सिंदूर' सुरु केल्यानंतर आय पी एलचे सामने स्थगित केले गेले होते.

**<u>पाऊस-नाशिक</u>**

राज्यात कालही अनेक ठिकाणी पाऊस झाला. नाशिक जिल्ह्यात वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसात एका युवतीचा वीज कोसळून तर एका दुचाकीस्वाराचा अंगावर झाड पडून मृत्यू झाला.

**<u>हवामान</u>**

उद्या सकाळपर्यंतच्या अंदाजानुसार, कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी मेघगर्जना, विजा आणि सोसाट्याच्या वाऱ्यांसह पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.